जिल्हा व सत्र न्यायालय सांगली, जिल्हा सांगली यांचे नवीन इमारतीकरीता १२ उद्वाहनचालक व ३ बागकामगार यांची काल्पनिक पदे निर्माण करणे व त्यांच्या सेवा बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन घेण्यास प्रशासकीय मान्यता देणेबाबत ¤......

महाराष्ट्र शासन
विधि व न्याय विभाग
शासन निर्णय क्रमांकः कंत्राटी २०१८/प्र.क्र.२८/का.१२

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
तारीख: ३१ मे, २०१८

वाचा-

१ शासन निर्णय , विधि व न्याय विभाग क्रमांकः पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का.१२, दिनांक २७.०१.२०१५

२ शासन शुद्धीपत्रक विधि व न्याय विभाग क्रमांकः पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का.१२, दिनांक ०३.०२.२०१५

३ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांकः कंत्राटी २०१६/प्र.क्र.१९४/का.१२, दिनांक २३.०२.२०१७

४ शासन परिपत्रक वित्त विभाग क्रमांक पदनि २०१६/प्र.क्र.२९/१६/वित्तिय सुधारणा १, दिनांक ०२.०८.२०१६

५ शासन निर्णय विधि व न्याय विभाग क्रमांक कंत्राटी २०१६/प्र.क्र.१९४/का.१२, दिनांक ०९.०८.२०१७

६ सहायक प्रबंधक (निरीक्षणे), उच्च न्यायालय (अपील शाखा), मा.उच्च न्यायालय मुंबई यांचे पत्र क्रमांक ब जन -१००१/२०१८/३०२, दिनांक २६.०२.२०१८

७ जिल्हा व सत्र न्यायालय सांगली यांचे पत्र क्रमांक जा.क्र./१७६२/२०१८, दिनांक २४.०२.२०१८

प्रस्तावना-

उपरोक्त संदर्भाधीन अ.क्र. (१), (२), (३) व (५) येथील शासन निर्णयान्वये राज्यातील जिल्हा व सत्र न्यायालये यांमध्ये बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पद्धतीने सेवा उपलब्ध करुन घेताना अनुसरावयाच्या बंधनकारक बाबी निश्चित करण्यात आल्या आहेत. दिनांक २६.०२.२०१८ रोजीच्या पत्रान्वये सहाय्यक प्रबंधक, मा.उच्च न्यायालय मुंबई यांनी जिल्हा व सत्र न्यायालय सांगली, जिल्हा सांगली येथील नवीन इमारतीकरीता उद्वाहनचालक व बागकामगार यांची काल्पनिक पदे निर्माण करुन त्यांच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करुन देण्याची विनंती केलेली आहे. त्या अनुषंगाने शासनाने खालील निर्णय घेतला आहे.

शासन निर्णय-

जिल्हा व सत्र न्यायालय सांगली, जिल्हा सांगली येथील नवीन इमारतीकरीता १२ उद्वाहनचालक व ३ बागकामगार यांची काल्पनिक पदे निर्माण करण्यास व त्यांच्या सेवा बाह्य यंत्रणेद्वारे कंत्राटी तत्वावर उपलब्ध करुन घेण्यास शासन मान्यता देण्यात येत आहे.

२. उपरोक्त १५ पदे बाह्ययंत्रणेद्वारे कंत्राटी पद्धतीने उपलब्ध करुन घेताना विधि व न्याय विभाग, शासन निर्णय क्रमांक पदनि २५१२/प्र.क्र.१५७/का.१२, दिनांक २७ जानेवारी, २०१५ व संबंधित शासन निर्णयांमधील सर्व अटी व शर्तीचे पालन करणे बंधनकारक असेल.

३. यासाठीचा खर्च मागणी क्रमांक जे-१, २०१४-न्यायदान, (००) १०५ दिवाणी व सत्र न्यायालये, (०२) जिल्हा व सत्र न्यायाधिश, (०२) (०१) जिल्हा व सत्र न्यायाधिश (२०१४ ०१७२) दत्तमत, १३ कार्यालयीन खर्च या लेखाशीर्षाखाली तरतुद करुन खर्ची टाकण्यात यावा.

४. सदर शासन निर्णय, वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक २७४/व्यय-५, दिनांक १५.०३.२०१८ व वित्त विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक १७४/आपुक, दिनांक १५.०३.२०१८ अन्वये व सामान्य प्रशासन विभागाच्या अनौपचारिक संदर्भ क्रमांक ३३१/२०१८/का.१२, दिनांक ३१.०३.२०१८ अन्वये त्या विभागाच्या मान्यतेने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०६०११११४९४५५६१२ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Amogh
Shyamkant
Kaloti

Digitally signed by Amogh Shyamkant Kaloti
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Law and Judiciary Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=1f733daf00a6028414c43d0cc10d82acab3b732c4edd56e818f8a3b355588753, serialNumber=9ebeebf21dc54ceec51e6d5ffc84bb94ca6af89497279007d66e97dc13547037, cn=Amogh Shyamkant Kaloti
Date: 2018.06.01 11:49:29 +05'30'

(अ. श्यां. कलोती)
विधि सल्लागार नि सह सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा.विरोधी पक्षनेता, विधानमंडळ सचिवालय,
२. मा.विधानमंडळ सदस्य, महाराष्ट्र
३. प्रबंधक (निरीक्षणे -१/२), मा.उच्च न्यायालय मुंबई
४. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधिश, सांगली,
५. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र १ /२, मुंबई, नागपूर
६. महालेखापाल (लेखापरीक्षा), महाराष्ट्र १/२, मुंबई / नागपूर,
७. जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली

८. उप जिल्हा कोषागार अधिकारी, सांगली

९. सामान्य प्रशासन विभाग (का.१३)

१०.वित्त विभाग, व्यय-५ / आ.पु.क,

११.विधि व न्याय विभाग, का.७, ११, १३, २३ व २४

१२.निवडनस्ती (का.१२).